अतारांकित प्रश्नोत्तरांची ४७ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## नागपूर शहरातील गणेशपेठ बसस्थानकाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१) १४८ (२६-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रशस्त जागेत असलेल्या एसटी महामंडळाच्या गणेशपेठ बसस्थानकाचे बसपोर्टमध्ये रुपांतर करणाचे काम ७ वर्षे होवूनही अद्यापपर्यंत पूर्ण झाले नसल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणेशपेठ बसस्थानकाच्या जुन्या इमारतीचे नुतनीकरण, नव्या इमारतीचे बांधकाम आणि बसस्थानकावर १० नवीन फलाट तयार करण्याचे काम सन २०१८ मध्ये सुरू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन गणेशपेठ बसस्थानकाची कामे पूर्ण करण्याबाबबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०७-२०२६) :** (१), (२), (३), (४) गणेशपेठ बसस्थानकाचे अतिरिक्त १० नविन फलाट तयार करण्याचे काम पुर्ण करण्यात आले असून, सदयस्थितीत गणेशपेठ बसस्थानक कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. कंत्राटदाराचे कामास झालेल्या विलंबाबत कंत्राटदारावर दंडनीय कारवाई करण्यात आलेली आहे.

---

## महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ५२५ (२६-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्हयात २५ खाटांचे रुग्णालय उभारण्याचा निर्णय मा.परिवहन मंत्री यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच अत्यंत प्रतिकूल परिस्थीतीत काम करत असलेल्या महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना उच्च दर्जाच्या आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१३-०७-२०२६) :** (१) रुग्णालय उभारण्याच्या संकल्पनेबाबत सुसाध्यता तपासण्या करिता कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) रा.प. महामंडळातील अधिकारी/ कर्मचारी व अवलंबित यांचेकरीता वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती आंतररुग्ण विभाग (IPD) व बाहयरुग्ण विभाग (OPD) सूविधा उपलब्ध आहे.

रा.प.महामंडळातील अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी "धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजने" अंतर्गत दिनांक ०१/१०/२०२५ च्या परिपत्रकात नमुद चाचण्याचा तपासणीचा प्रत्यक्ष खर्च व रु.३०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती प्रतिपूर्ती म्हणून अनुज्ञेय राहिल. त्याकरीता कोणतेही अग्रीम देता येणार नाही. तसेच दिनांक ०१/०२/२०२४ च्या परिपत्रकानुसार इतर सूचना कायम ठेऊन फक्त वयाची अट रद्द करण्यात येत असून यापुढे रा.प.महामंडळातील सरसकट सर्व कर्मचाऱ्यांसाठी "धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना" लागू करण्यात आलेली आहे.

(३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दिनांक २८/०७/२०२३ नुसार रा.प.अधिकारी/कर्मचारी व कुटुंब या व्याख्येनुसार यांचेसाठी रा.प.महामंडळ परिपत्रक दिनांक २८/०२/२०२५ अन्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेचा लाभ शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार लागू करण्यात आलेला आहे.

रा.प.महामंडळाच्या नामिकेवरील रुग्णालयांची व्याप्ती वाढविण्यात आली असून एकूण रुग्णालयांची संख्या २२७ झालेली आहे. सद्य:स्थितीतील नमूद तसेच नव्याने समावेश होणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय चाचण्या, क्ष-किरण तपासणी व वैद्यकीय सल्ला फी यामध्ये सरसकट ९० टक्के रक्कम अदा करणे बाबत परिपत्रक दिनांक ०१/१०/२०२५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे.

---

## मोदी आवास योजनेंतर्गत घरकूल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना योजनेचा दुसरा हप्ता मिळाला नसल्याबाबत

**(३) ५९० (२९-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोदी आवास योजनेंतर्गत चारठाणा (जि.परभणी) येथील घरकूल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना प्रशासकीय पातळीवर निधी उपलब्ध नसल्याने योजनेचा दुसरा हप्ता मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पहिला हप्ता १५ हजार रुपये अनुदान प्राप्त झाल्यानंतर अनेकांनी पायाभरणी करुन ज्योत्याचे काम केल्यानंतर शासनाकडून दुस-या हप्त्याचे अनुदान न मिळाल्यामुळे उक्त योजनेंतर्ग घरकुलाची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन चारठाण तालुक्यातील मोदी आवास योजनेंतर्ग प्रलंबित घरकुलांची कामे तातडीने सुरु होऊन ते पूर्ण होण्यासाठी लाभार्थ्यांना अनुदानाचे पुढील हप्ते देण्याच्या अनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (११-०६-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या लाभार्थी उद्दिष्टाकरीता आवश्यक आलेला संपुर्ण निधी शासनस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण या अंमलबजावणी यंत्रणेस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरहू योजनेंतर्गत घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्याच्या

बँक खात्यात जमा करण्यात येते.

सदरहू योजनेंतर्गत ग्रामपंचायत चारठाणा (जि.परभणी) करीता २८१ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यापैकी २६८ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, २१९ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, १३४ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता व ४८ लाभार्थ्यांना चौथा हप्ता वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी येथे बस स्थानकात एलईडी बसवून प्रवाशांच्या सोयीसाठी मोबाईल ॲप तयार करण्याबाबत**

**(४) ६१६ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे विभागीय नियंत्रक कार्यालयांतर्गत एसटी प्रवाश्यांना प्रत्येक गाडीची लाईव्ह लोकेशन कळावे याकरीता परभणी जिल्ह्यातील ४ व हिंगोली जिल्ह्यातील ३ अशा एकुण ७ आगारातील ४०१ गाड्यांना ट्रॅकिंक सिस्टीम बसविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांना लाईव्ह लोकेशन कळण्यासाठी या विभागातील सातही बसस्थानकात एलईडीची अद्यापही व्यवस्था करण्यात आली नसल्यामुळे प्रवाश्यांना गाड्यांची वेळ कळत नसल्याने मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने बसस्थानकात बसेसचे लाईव्ह लोकशन, गाड्यांचे वेळापत्रक प्रवाश्यांना कळण्यासाठी एलईडी बसविण्याच्या तसेच प्रवाश्यांच्या सोयीसाठी मोबाईल ॲप लवकर सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१५-०७-२०२६) :** (१) परभणी जिल्ह्यातील ४ व हिंगोली जिल्ह्यातील ३ अशा एकूण ७ आगारामधील ४०९ रा.प. बसेसना व्हिटीएस ट्रैकिंग सिस्टीम उपकरण बसविण्यात आलेले आहेत.

(२) परभणी, हिंगोली, जिंतुर व कळमनुरी बस स्थानकामधे २६ एलईडी पीआयएस सुरू आहेत. रा.प.पाथरी, वसमत, गंगाखेड बसस्थानकाचे बांधकाम सुरू असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव ६ पीआयएस काढुन ठेवण्यात आले आहेत. नादुरूस्त २ पीआएस दुरूस्तीचे कामकाज सुरू आहे.

(३) व (४) बसेसचे लाईव्ह लोकेशन उपलब्ध होण्याकरिता विभागातील ४०९ रा. प. बसेसना व्हिटीएस ट्रॅकिंग सिस्टीम उपकरण बसविण्यात आलेले आहेत. गाड्यांचे वेळापत्रक प्रवाशांना कळण्यासाठी परभणी, हिंगोली, जिंतुर व कळमनुरी बस स्थानकामधे २६ एलईडी पीआयएस सुरू आहेत. रा.प. पाथरी, वसमत, गंगाखेड बसस्थानकाचे बांधकाम प्रगती पथावर असुन नवीन जागेत लवकरच एलईडी बसविण्यात येत आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी मार्गावरील बसेसचे प्रत्यक्ष ठिकाण उपलब्ध होण्याकरिता आपली एस टी ॲप गुगल प्ले स्टोअर व ॲप स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील सिंहगड किल्ल्याच्या संवर्धनाबाबत**

**(५) ८२८ (२७-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड किल्ला (जि.पुणे) येथे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या संरक्षण भिंतीची दुरुस्ती, बळकटीकरण,

सुरक्षिततेची नियमित पाहणी, रेलिंग्स किंवा इतर संरचना उभारण्यासाठी शासनाने कोणता आराखडा तयार केला आहे,

(२) तसेच एमटीडीसीकडून सिंहगड किल्ल्याच्या हद्दीत वापराहीन केलेल्या व अनावश्यक खर्चामुळे गडाचे विद्र्युपीकरण होत असून संवर्धनासाठी वापरलेला निधी कोणत्या प्रकल्पांसाठी खर्च करण्यात आला आहे आणि त्याचे मूक्यांकन कोणत्या पद्धतीने केले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गडाच्या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संवर्धन सुनिश्चित करण्यासाठी एमटीडीसी कोणते धोरण राबविण्यात येत आहे आणि पर्यटनवाढीसाठी, अनावश्यक खर्च टाळण्यासाठी व निधीचा उपयोग सुनिश्चित करण्यासाठी कोणती उपाययोजना केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, किल्याच्या महत्वाच्या वस्तूंची पडझड व अत्यंत दुर्दशा होत असून समाधी स्थळ, पिण्याच्या पाण्याची सोय, बुरुजांची दुरवस्था, पर्यटकांसाठी मुलभूत सोयी सुविधा आणि गडाच्या पायवाटे दरम्यान महावितरणच्या धोकादायक अवस्थेत असलेल्या विद्युत तारा व पोल बदलण्याबाबत कोणती उपयायोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर गडाच्या सुरक्षिततेसाठी व संवर्धनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय व त्याचा वापर कशा प्रकारे करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गडाच्या पर्यटकांसाठी मुलभूत सोयी सुविधा, संरक्षण व संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१८-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

"समग्र सिंहगड किल्ला व परिसर विकास" याकरीता नियोजन विभागामार्फत ₹२८५.९९ कोटी इतक्या रकमेच्या आराखड्यास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/०६/२०२५ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

यामध्ये छत्रपती राजाराम महाराजांची समाधी दुरुस्ती, किल्ल्याची संरक्षित भिंत, किल्यावर जाण्याकरीता मार्ग व पदपथ तयार करणे, किल्ल्यावरील मंदिरे व ५२ विहिरी /तळे यांची दुरुस्ती व नुतनीकरण, जुन्या राजवाड्याचे संग्रहालयात रुपांतर, उदयभान समाधी दुरुस्ती, तसेच पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्थापन आणि आपत्कालीन सेवा, किल्ल्याचे संरक्षण, संवर्धन, मुल्यवर्धन, परिसंस्था संरक्षण व भूमिचित्र विकास, ट्रेक मार्ग सर्किटचा विकास, प्रकाश व्यवस्था, मनोरंजनात्मक कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन या कामांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळामार्फत (MTDC) केंद्र तथा राज्य शासनाच्या अर्थसहाय्याने सिंहगड किल्ला दुरुस्ती व परिसर विकास आणि जतन-संवर्धन याकरीता वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

केंद्र शासनाकडून सन २००५-०६ या आर्थिक वर्षात सिंहगड किल्ल्यासाठी ₹३.६७ कोटी इतका निधी MTDC कडे वितरीत करण्यात आला. यामध्ये अतिथीगृह नुतनीकरण, ध्यानधारणा केंद्र उभारणी, पदपथ, रेलिंग व सायनेजेस, संरक्षक कठडे, वाहनतळ, प्रसाधनगृहाची उभारणी ही कामे करण्यात आली.

पर्यटन विभागाकडून "किल्ले मालिका विकास" अंतर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात सिंहगड किल्ल्यासाठी ₹२.२८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला. यामध्ये माहिती व दिशादर्शक फलक बसविणे, पदपथांचे सुशोभिकरण, संग्रहालय व खुले सभागृह उभारणे, स्वच्छतागृह बांधकाम या कामांचा समावेश

आहे.

तसेच, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पर्यटक निवासाचे नुतनीकरण करण्यासाठी ₹१.९४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) व (५) "समग्र सिंहगड किल्ला व परिसर विकास आराखडा" अंतर्गत ₹२८५.९९ कोटी इतक्या रकमेस मा.उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे.

सदर आराखड्यांतर्गत संबंधित सर्व कामे हाती घेण्यात आली आहेत.

(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## मौजे साखरपा (ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी) येथील रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वे गाड्यांना संलग्न एसटी बस सेवा सुरु करण्याबाबत

**(६) ९९५ (०८-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साखरपा (ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी) तसेच आजूबाजूच्या अनेक गावांतून मुंबईपर्यंत रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त असून संगमेश्वर व रत्नागिरी रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वे गाड्यांना सलग्न थेट एस. टी बसेस उपलब्ध नसल्याने प्रवाशांची गैरसोय  होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरपा एस.टी स्थानकातून संगमेश्वर व रत्नागिरी रेल्वे स्थानकापर्यंत कोकणकन्या, तुतारी, दिवा पॅसेंजर, मांडवी एक्स्प्रेस, जनशताब्दी या रेल्वे गाड्यांना सलग्न विशेष थेट एस.टी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मा.मंत्री, परिवहन यांच्याकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०१-०७-२०२६) :** (१) नाही.

(२), (३) व (४) सदर बाबतीत स्थानिक नागरिकांकडून आलेल्या मागणीच्या अनुषंगाने रत्नागिरी आगाराच्या कोल्हापूर आगाराच्या कोल्हापूर मार्गावरून धावणा-या लांब पल्ला, मध्यम पल्ला नियते व्हाया रेल्वे स्टेशन मार्गे चालविण्यात येत आहेत. साखरपा ते रत्नागिरी सकाळी ०४.३० ते रात्री २३.०० पर्यंत एकुण २९ फेऱ्या सुरू असून त्याचा लाभ प्रवासी घेत आहेत.

---

## महाराष्ट्र राज्याचे पहिले एआय (AI) (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करण्याचे निदेश दिल्याबाबत

**(७) १०१९ (०८-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याने डिजिटलायजेशन नंतर आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत दिशादर्शक व्हावे यासाठी राज्याचे पहिले एआय (AI) (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करण्याचे निदेश शासनामार्फत माहे डिसेंबर, २०२४ मध्ये देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एआयचा प्रभावी उपयोग करून आपण अधिक उद्योग व व्यवसाय आकर्षित करीत तरुणांना

रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो त्यासाठी माहे मार्च, २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत देशभरात एआय क्षमता वाढवण्यासाठी रुपये १०,३७२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात समाजमाध्यांवर एआयचा उपयोग करून सामाजिक, धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर जरब बसवण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे तसेच कठोर शिक्षेची तरतूद करण्यासाठी येणाऱ्या काळात शासनाकडून कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार राज्यात एआयचे धोरण तयार करुन सदरहू धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१२-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. केंद्र शासनाने मार्च २०२४ मध्ये 'इंडिया एआय मिशन' (India Al Mission) ला मंजुरी दिली असून, यासाठी पुढील पाच वर्षांकरिता १०,३७२ कोटी इतक्या भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी गृह विभागाकडून प्राप्त माहितीनुसार राज्यस्तरावर "सायबर सुरक्षा प्रकल्पाची" अंमलबजावणी सुरु असून, सायबर गुन्हांचा अभ्यास, विश्लेषण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. एआयचा गैरवापर करून सामाजिक किंवा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० (IT Act) आणि इतर संबंधित कायद्यांच्या चौकटीत राहून सायबर गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात येते.
(४) 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) या क्षेत्रात राज्याची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी सर्वसमावेशक एआय धोरण दिनांक ०६.०५.२०२६ रोजी घोषित करण्यात आले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर, बल्लापूर, मुल, पोंभुर्णा, सावली आदी सर्वच तालुक्यामधील शेतातील कृषीपंपांना विद्युत जोडणी मिळण्याबाबत

**(८) १०३६ (२६-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर, बल्लारपूर, मुल, पोंभुर्णा, सावली आदी सर्वच तालुक्यांमध्ये शेतातील कृषीपंपांना विद्युत जोडणी मिळण्याबाबतची प्रकरणे मोठया संख्येने प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कृषीपंपांना विज जोडणी मिळण्याबाबतची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२६) :** (१), (२) व (३) बाबत,

चंद्रपूर जिल्हयात मागील ५ वर्षांत एकूण ११३८७ शेतकऱ्यांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

तसेच, एकूण १२३३ शेतकऱ्यांनी मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेमध्ये पैसे भरणा केलेला असून, त्यापैकी ८६५ अर्जदारांनी पुरवठादाराची निवड केलेली आहे व ४६४ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. तसेच उर्वरित शेतकऱ्यांचे सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पी.एम. कुसुम घटक योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्हयात महावितरणद्वारे एकूण ३५४ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात राजर्षी शाहू महाराज वृध्द कलाकार मानधन योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(९) ११४६ (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने वृध्द कलाकारांसाठी राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजना सुरु केली असून सांगली जिल्हयातील वृध्द कलाकार वर्षभर मानधनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन मंजुरीची निवड यादी प्रसिद्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांना दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू कलाकरांच्या मानधन मंजूरीची निवड यादी शासनाकडून तयार करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सांगली जिल्ह्यातील वृध्द कलाकारांना प्रलंबित मानधन देण्यासह राज्यातील उक्त योजनेंतर्गत असलेल्या सर्व कलाकरांची मानधन मंजूरीची निवड यादी प्रसिध्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही. सांगली जिल्हयातील सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ करीता प्रतिवर्षी १०० इष्टांका प्रमाणे एकूण २०० कलाकारांची मंजूरी माहे मार्च २०२४ मध्ये झालेली आहे. त्यांना नियमित मानधन अदा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सांगली जिल्हयातील २००० लाभार्थ्यांना नियमित मानधन अदा करण्यात येते.
(२), (३) व (४) हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. सांस्कृतिक कार्य मंत्री यांना दिलेले निवेदन शासनास दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्राप्त झाले होते. राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजनेअंतर्गत कलाकारांची यादी जिल्हास्तरीय समितीमार्फत संचालनालयास प्राप्त झाली असुन पात्र कलावंताना नियमित मानधन सुरु करण्यात आलेले आहे.
राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजनेअंतर्गत मानधन अदा करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या शासकीय संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.
(५) लागू नाही.

---

## राज्यातील एस.टी. महामंडळ आगाराच्या जागा बी.ओ.टी. तत्वावर देण्याबाबत

**(१०) ११८४ (२६-०४-२०२५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात मोक्याच्या ठिकाणी असलेल्या एस.टी आगाराच्या जागा बांधा-वापरा- हस्तांतरित करा (B.O.T.) या तत्वावर खाजगी विकासकाला देण्याबाबतचा करार ३० वर्षाऐवजी ६० वर्षांचा केला असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कराराअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या महामंडळाच्या भूखंडावर एस.टी. महामंडळाचा मालकी हक्क अथवा भागीदारी असणार आहे काय, हे खरे आहे काय,

(३) तसेच एसटीमहामंडळाचे राज्यभर २५१ डेपो आणि ५९८ बसस्थानके असून राज्यात ८४२ ठिकाणी १ हजार ३६० हेक्टर जमीन विकासकांकडे ९९ वर्षाच्या भाडेकरारावर देण्याचा प्रस्ताव शासनाकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कराराअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या महामंडळाच्या भूखंडावर स्थानिक युवकांना रोजगार व नोकरीची संधी उपलब्ध होण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१३-०७-२०२६) :** (१), (२) व (३) रा. प. महामंडळाच्या जागा ६० वर्षाऐवजी सार्वजनिक खाजगी सहभागांतर्गत (PPP) ४९+४९ असे एकूण ९८ वर्षांकरीता विकसीत करण्याबाबत दिनांक १/९/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे.

भुखंडावर रा.प.महामंडळाचा मूळ मालकी हक्क अबाधित असणार आहे.

(४) व (५) सार्वजनिक-खाजगी-सहभाग अंतर्गत (PPP) विकसित करण्यात येत असलेल्या रा.प.महामंडळाच्या भूखंडावर विकासकामार्फत व्यावसायीक आस्थापना बांधण्याचे नियोजन आहे. अशा विकसनातून नोकरी/व्यवसाय/रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

---

## अकोला येथील नवीन बस स्थानकांची झालेली दुरवस्था

**(११) १५२० (०८-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील नवीन बस स्थानकांच्या दुरुस्तीचे काम सुरु असल्यामुळे अनेक बसेस जुन्या बसस्थानकातून सोडण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी होत असून याठिकाणी पंखे नसणे, घाणीचे साम्राज्य पसरलेले असणे इत्यादी कोणत्याही सोयी-सुविधा नसल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अद्ययावत बसस्थानक बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०७-२०२६) :** (१) होय.
(२), (३) व (४) रा.प.महामंडळ अकोला येथील जुन्या बसस्थानकाच्या परिसराच्या स्वच्छता करण्यात येते. प्रवाशी प्रतिक्षालयात आवश्यकतेनुसार एकूण ०८ पंखे व १० टयुबलाईट चालू स्थितीत आहेत. जुन्या बसस्थानकाची ईमारत क्र. १ ची जागा अकोला म.न.पा.तर्फे भाडे तत्वावर घेण्यात आली असून, सदरची जागा म.न.पा. कडुन परत मागण्यात येत असल्याने नविन बसस्थानक बांधण्याचा प्रस्ताव नाही. तेथे नवीन बसस्थानक ईमारत क्र.२ सन १९८० मध्ये बांधण्यात आलेले असुन, त्या ठिकाणी सार्वजनिक खाजगी सहभाग अंतर्गत नवीन बसस्थानक बांधणे करता सुसाध्यता तपासण्यात येत आहे.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील बस पोर्टलचे नवीन काम मागील सहा वर्षापासून अपूर्ण असल्याबाबत

**(१२) १५९२ (०८-०४-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील बस पोर्टलचे नवीन काम मागील सहा वर्षापासून अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम अपूर्ण असल्याचे कारणे काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी करुन सदर बस स्थानक बांधकाम करणाऱ्या व त्यांना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१४-०७-२०२६) :** (१) होय.
(२), (३) व (४) कोराना जागतिक महामारी, क्षेत्रीय अडचणी, शौचालयाचे स्थलांतरण तसेच कंत्राटदाराकडून झालेल्या संथगती कामांमुळे कामास विलंब होत असल्याने मार्च २०२२ मध्ये त्यांच्या विरुध्द निविदा शर्ती नुसार कारवाई करुन त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले असून, नवीन निविदा निश्चिती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत बसस्थानकाचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## जत (ता.जत, जि.सांगली) येथील सद्याचे बसस्थानक नव्याने बांधण्याबाबत

**(१३) १९५७ (०८-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील बसस्थानक व राज्य परिवहन महामंडळाचे नवनिर्मित आगार येथील मोकळ्या जागेत एकाच ठिकाणी असल्याने बसस्थानक वाहतुकीच्या दृष्टीने अपुरे पडत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानक महामार्गलगत असल्याने सदर बसस्थानकावरुन येणाऱ्या बस गाड्यांची संख्या व प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सद्याचे बस स्थानक वाहतुकीच्या दृष्टीने अपुरे तर प्रवाशांच्या दृष्टीने गैरसोयीचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बसस्थानक परिसरात स्वतंत्र आधुनिक बसस्थानक व सोलनकर चौक जत येथील मोकळया जागेत स्वतंत्र आगार कार्यशाळा निर्मिती करण्याबाबत तसेच परिसरात क्राँक्रीटीकरण व संरक्षण भिंत आणि इतर सोयीसुविधांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन जत येथील बस स्थानकाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१३-०७-२०२६) :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) जत जिल्हा सांगली येथील सोलनकर चौक येथील नगर परिषद, जत यांच्या मालकीची ११,११२.८० चौ.मी. जागेचा ताबा अद्याप रा.प.महामंडळास प्राप्त झालेला नाही. सदर जागेचा ताबा पुर्णत: प्राप्त झाल्यावर तेथे नवीन आगार बांधण्याचे नियोजन आहे. सदर जागा रा.प. महामंडळाच्या नावे करणेकरीता संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील पवनऊर्जा उपकेंद्र महापारेषण कंपनीकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(१४) १९६३ (२७-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील पळसवाडी पवनऊर्जा उपकेंद्र, खानापूर स्विचिंग उपकेंद्र, मेंडीगिरी पवनऊर्जा उपकेंद्र, वासपेठ पवनऊर्जा उपकेंद्र, शेड्याळ पवनऊर्जा उपकेंद्र इ. पवनऊर्जा केंद्र कार्यान्वित असून सदरहू पवनऊर्जा उपकेंद्र महापारेषण कंपनीकडे हस्तांतरित केल्यास, ३३ केव्ही विद्युत वाहिनी उभारणीच्या खर्चात कपात होऊन जत, संख, कवठेमहांकाळ, विटा, आटपाटी, खानापूर तालुक्यातील वीज ग्राहकांना अखंडित व योग्य दाबाने विद्युत पुरवठा करणे सोयीचे होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यामध्ये पुढील ५ वर्षामध्ये ८ लाख सोलार कृषी पंप ग्रीड कनेक्टेड बसविल्यास २०००MW विजेची बचत होणार आहे तसेच, लघुदाब व उच्चदाब वाहिनीवरील आणि डिस्ट्रिब्यूशन बॉक्स वरील भार कमी होऊन बॉक्स जळण्याचे व तारा तुटण्याचे प्रमाण कमी होऊन मेंटेनन्स वरील खर्च देखील कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील पवन ऊर्जा उपकेंद्र महापारेषणच्या ताब्यात मिळण्याकरिता मा.मुख्यमंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्ह्यातील पवनऊर्जा उपकेंद्र महापारेषण कंपनीकडे हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे,

नवीन व नविकरणीय ऊर्जा धोरण-२००८ मध्ये पवन ऊर्जा प्रकल्प उपकेंद्र हस्तांतरित करण्याची तरतूद

आहे. सांगली जिल्ह्यातील वासपेठ पवनउर्जा उपकेंद्र प्रकल्पास नविन व नवीकरणीय ऊर्जा धोरण २००८ लागू असून सदर प्रकल्प हस्तांतरीत करता येणे शक्य आहे.

मात्र, पळसवाडी पवनऊर्जा उपकेंद्र, खानापूर स्विचिंग उपकेंद्र, के.व्ही. मेंढेगिरी पवन ऊर्जा उपकेंद्र प्रकल्प व के.व्ही. शेड्याळ पवन ऊर्जा उपकेंद्र यांना महाऊर्जा कार्यालयाचे मुलभूत सुविधा संमती पत्र प्राप्त नसल्याने नविन व नवीकरणीय ऊर्जा धोरण-२००८ लागू नाही त्यामुळे सदर पवन ऊर्जा उपकेंद्र प्रकल्प महापारेषणकडे हस्तांतरीत करता येत नाहीत.

(२) महावितरण कंपनी मार्फत शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पारेषण संलग्न (Grid connected) सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून पथदर्शी प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर पथदर्शी प्रकल्प राबवित असताना येणारे अनुभव, अडचणी, प्रकल्पाची उपयुक्तता, व्यवहार्यता इत्यादी बाबींचे अवलोकन करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) होय, हे खरे आहे,

(४) वासपेठ पवनऊर्जा उपकेंद्र प्रकल्पाच्या विकासकाने महापारेषण कंपनीस हस्तांतरीत केल्यास व विकासकाने वीज वहन करण्यासाठी आवश्यक तेवढी जागा दिल्यास, महापारेषण कंपनी अतिरिक्त १३२/३३ के.व्ही. रोहित्रे ऊभारुन महावितरणतर्फे वीज ग्राहकांना वीज पुरवठा करता येणे शक्य आहे.

महापारेषण कंपनीच्या कार्यकारी अभियंता, अ.ऊ.दा प्रकल्प विभाग, सांगली या कार्यालयाने वासपेठ पवन ऊर्जा प्रकल्पाचे विकासक मे.मारूती विंड पार्क डेव्हलपर्स यांना १३२ के.व्ही.वासपेठ उपकेंद्र व त्याची संलग्न वाहिनी महापारेषण कंपनीस हस्तांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव व आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले आहे. तथापि, अद्याप विकासकाने संबंधित कार्यालयास आवश्यक कागदपत्रे जमा केलेली नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील महावितरणच्या भांडुप-कल्याण परिमंडळात वीज चोरी रोखण्याबाबत

**(१५) २४७१ (२५-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील महावितरणाच्या भांडुप-कल्याण परिमंडळात विजेची चोरी करणारे चोर हायटेड पद्धतीने व अनेक अनेक नवीन युक्त्या बनवून चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, आतापर्यंत किती वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत व त्यानुषंगाने वीज चोरांवर कारवाई करण्यासह वीज चोरीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीमार्फत उघडकीस आलेल्या वीजचोरी प्रकरणांमध्ये विद्युत कायदा २००३, कलम १३५ अनुसरुन संबंधित वीज वापरकर्त्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) माहे-एप्रिल २०२२ ते मार्च २०२५ पर्यंत हायटेक च्या सहाय्याने ४०७०६ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आलेली आहे. सदर वीजचोरी प्रकरणांमध्ये एकूण रु.२०९.२५ कोटी इतक्या रक्कमेचे निर्धारण करण्यात आलेले आहे. तसेच त्यापैकी एकूण रु.११८.०३ कोटी इतक्या रक्कमेची वसुली करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे ४८९९ वीजचोरी प्रकरणांमध्ये निर्धारण रक्कम व तडजोड रक्कम निर्धारित कालावधीत अदा न केल्याने संबधित

पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच वीजचोरी थांबविण्यासाठी उपाययोजना म्हणुन महावितरणमार्फत वेगवेगळया पातळीवर वेळोवेळी विशेष तपासणी मोहीम राबवून वीजचोरांविरुद्ध कारवाई करण्यात येते. त्याचबरोबर महावितरणद्वारे नव्याने विकसित Automated Theft Management System (ATMS), M-DAS इत्यादी आधुनिक माहिती तंत्रज्ञान प्रणालीचा वापर करण्यात येऊन संभावित वीजचोरांच्या आस्थापनेची तपासणी करुन वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर विद्युत कायदा २००३ चे कलम १३५, १३८ व १२६ अन्वये प्रकरणपरत्वे कारवाई करण्यात येते. गरजेनुसार परिक्षेत्र कार्यालयअंतर्गत कार्यरत असलेल्या भरारी पथकांची सुद्धा वीजचोरी शोधण्यासाठी विशेष तपासणी मोहिमेत नेमणुक केली जाते. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमध्ये वीजचोरी न करणेबाबत आवाहन करण्यात येते. त्याचबरोबर महावितरणमार्फत वीजचोरीची माहिती देणाऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणच्या नियमानुसार बक्षिस सुद्धा देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगोला (जि.सोलापूर) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करुन नवीन पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याबाबत

**(१६) २४८८ (२५-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करून नाझरे-कोळे मिळून ३५ गावांसाठी हातीद येथे तर २२ गावांसाठी महूद या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनची निर्मिती करावी यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगोला तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १,५६७,१३ चौरस किलोमीटर असून लोकसंख्या चार लाख २४ हजार ९१० वर पोहोचली असून १०३ गावांच्या सुरक्षेची जबाबदारी एकाच पोलीस स्टेशनवर अवलंबून असून, गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असल्याने तेथील पोलिसांवर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सांगोला पोलीस स्टेशनचे विभाजन करून नवीन पोलीस स्टेशन निर्मितीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०२६) :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील सांगोला पोलीस ठाण्याचे विभाजन करुन हातीद व महुद येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कार्यायामार्फत दिनांक २७.२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास सादर करण्यात आला असून सद्य:स्थितीत सदर प्रस्तावाची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावर पडताळणी सुरु आहे. सदरहू प्रस्ताव शासनास अद्याप अप्राप्त आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धाराशीव जिल्ह्यात जप्त केलेल्या वाहनांचे स्पेअरपार्ट चोरी होण्यापासून रोखण्याबाबत**

**(१७) २५३० (२५-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशीव जिल्हयात विविध भागातील पोलीस ठाणे व एमआयडीसी भागातील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील पोलीस कार्यवाहीत जप्त केलेली हजारो वाहनांचे स्पेअरपार्ट चोरीला गेले असून फक्त वाहनांचा सांगाडाच शिल्लक असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जप्त केलेल्या वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करुन वाहनांचा गेल्या दहा वर्षापासून लिलावही करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीसांच्या व परिवहन कार्यालयाच्या अखत्यारित असलेल्या सदर वाहनांतील स्पेअर पार्टची चोरी होत असेल तर या विभागाच्या संगनमताने होत आहे असे निदर्शनास येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जप्त केलेल्या वाहनांचे स्पेअरपार्ट चोरी होण्यापासून रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव कार्यालयाद्वारे सन २०२० ते सन २०२३ या कालावधीमध्ये एकूण ३७ वाहनांचा लिलाव करण्यात आला असून त्यातून रु. ८,६५,०००/- इतकी रक्कम जमा झाली आहे.

(३) परिवहन विभागाने अटकावून ठेवलेल्या वाहनांचे स्पेअर पार्टची चोरी झाल्याबाबतची तक्रार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव व पोलीस ठाण्यात अप्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाकडून रिक्षा स्टँडचे सर्वेक्षण प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) २६१३ (२५-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड शहरात मुक्त रिक्षा परवाना धोरण राबविल्याने रिक्षाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून मुख्य चौकात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करुन अनेक बेकायदेशीर रिक्षा स्टँड उभारल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शहरातील रिक्षा स्टँड चे सर्वेक्षण करण्याबाबत माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये जिल्हाधिकारी पुणे यांनी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील रिक्षा थांब्याचे अद्यापही सर्वेक्षण केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उद्योगनगरी पिंपरी चिंचवड शहरातील रिक्षा स्टँडचे शहरातील प्रमुख रिक्षा संघटनेचे मत जाणून सर्वेक्षण करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, सदर सर्वेक्षणाच्या आधारे नव्याने अधिकृत रिक्षा स्टँड करताना वाहतुकीला अडथळा ठरणारे जुने

अनधिकृत रिक्षा स्टँड हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०४-२०२६) :** (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक १७/०६/२०१७ व शासन निर्णय दिनांक २२/०९/२०१७ अन्वये ऑटोरिक्षा परवान्यावरील निर्बंध उठवून सर्वांनाच परवाने खुले करण्याचे मुक्त धोरण अवलंबिल्यामुळे रिक्षांच्या संख्येत वाढ झाली आहे. सद्यस्थितीत पिपरी चिंचवड कार्यालयात एकूण ४५२७५ रिक्षांची नोंदणी झालेली आहे

ऑटोरिक्षांच्या नवीन थांब्याबाबत सर्वेक्षण करुन त्याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ०३/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत दिला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड कार्यालयाद्वारे रिक्षा थांब्याचे सर्वेक्षण करुन प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी दिनांक १९/०५/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये १२३ रिक्षा थांब्यांना मान्यता दिली आहे.
(४) व (५) रिक्षा थांब्या संदर्भात वाहतूक पोलीस विभाग, परिवहन विभाग व रिक्षा संघटनेच्या प्रतिनिधींसोबत सर्वेक्षण करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, आळंदी नगरपरिषद व देहूरोड कॅन्टॉनमेंट बोर्ड येथे नव्याने रिक्षा स्टँडला मान्यता देण्यात आली आहे. याबाबत तसेच अनधिकृत रिक्षा स्टँड हटविण्याबाबत कळवण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यामधील वीज ग्राहकांना नवीन उपकेंद्र के.व्ही. वाहिनी यांचे नियोजन करण्याबाबत

**(१९) २८४२ (२७-०४-२०२५). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यामधील वीज ग्राहकांना वीजपुरवठा सुरळीतपणे देण्यासाठी RDSS योजनेअंतर्गत नवीन उपकेंद्र तसेच नवीन ३३ के.व्ही. वाहिनी आदिचे पुढील दहा वर्षाचे नियोजन करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चाळीसगाव तालुक्याकरिता अंदाजे ७३ कोटीचे काम अंतर्भूत केले असून याबाबत शासनाकडे रीतसर प्रस्ताव सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

चाळीसगाव (जि. जळगाव) तालुक्यामधील कामे RDSS-वाहिनी विलगीकरण, RDSS-वितरण हानी कमी करणे व वितरण प्रणाली बळकटीकरण व क्षमतावाढ (AIIB अर्थसहाय्यित) या योजनानअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
(२) व (३) बाबत,

चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यामधील वीज ग्राहकांना वीजपुरवठा सुरळीतपणे देण्यासाठी RDSS-वाहिनी विलगीकरण या योजनेअंतर्गत ११ के.व्ही. च्या १७ वाहिन्यांचा विलगीकरणाच्या कामाचा समावेश करण्यात आलेला असून एकूण रु.२२.४५ कोटी इतकी रक्कम मंजूर असून, सदर कामाचे कार्यादेश मे.अग्रवाल पावर प्रा. लिमिटेड, भोपाळ यांना दिनांक ०६/०४/२०२३ अन्वये देण्यात आलेले असून सदर कामे

प्रगतीपथावर आहेत.

RDSS-वितरण हानी कमी करणे या योजनेअंतर्गत एकूण रु. ११.८० कोटी इतकी रक्कम मंजूर झालेली असून सदर कामाचे कार्यादेश मे. भारत ईलेक्ट्रीकल्स प्रा.लि., सांगली यांना दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये देण्यात आलेले असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

वितरण प्रणाली बळकटीकरण व क्षमतावाढ (AIIB अर्थसहाय्यित) या योजनेंतर्गत १ नवीन उपकेंद्र व त्यासाठी लागणारी ३३ के. व्ही. केबल ०.५ कि.मी. व ३३ के.व्ही. लिंक लाईन ६४ कि.मी. अंतर्भूत करण्यात आलेली असून, चाळीसगाव तालुक्यातील वीजग्राहकांना उच्च दर्जाचा वीजपुरवठा मिळण्यासाठी एकूण रु. ५१.१२ कोटी इतकी रक्कम मंजूर झालेली असून, सदर कामाचे कार्यादेश मे. एन सी सी लिमिटेड, हैद्राबाद यांना दिनांक ०८.१०.२०२४ अन्वये देण्यात आलेले असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औसा, उमरगा, लोहारा व निलंगा या चार तालुक्यासाठी स्वतंत्र भूकंप पुनर्वसन समिती स्थापन करणेबाबत

**(२०) २८७२ (२५-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा, निलंगा (जि.लातूर), उमरगा (जि.उस्मानाबाद), लोहारा (जि.अकोला) या तालुक्यामध्ये कोयना भूकंप पुनर्वसन समितीच्या धर्तीवर भुकंपग्रस्तासाठी स्वतंत्र समिती स्थापन करून किंवा कोयना भूकंप पुनर्वसन समितीत सदरील तालुक्याचा समावेश करण्याबाबत तसेच भूकंपग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न व मागण्या मंजुरीसाठी लोकप्रतिनिधी, औसा यांनी माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे

(२) व (३) लातूर व धाराशिव जिल्ह्यातील प्रस्तूत गावांचा कोयना भूकंप पुनर्वसन समितीमध्ये समावेश न करता सदर गावांच्या विकासासाठी कालबध्द कार्यक्रम ठरविण्याकरीता विकास कामांची सद्यस्थिती व करावयाची कामे याबाबत दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२५ व १० डिसेंबर, २०२५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, लातूर व धाराशिव यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

---

## मुंबई महानगर प्रदेशात केबल कार सेवा विकसित करण्याकरिता प्रकल्पाचे सर्वेक्षण करुन विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(२१) ३०५३ (२५-०४-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशातील रस्ते वाहतूक, रेल्वे तसेच मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता “केबल कार” सेवा विकसित करण्याकरिता प्रकल्पाचे सर्वेक्षण करुन विकास आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव मा.परिवहन मंत्री यांनी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री मा.नितीन गडकरी यांच्याकडे माहे जानेवारी,

२०२५ मध्ये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत केंद्र शासनाकडून कशा प्रकारे प्रतिसाद मिळाला व त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०४-२०२६) :** (१) व (२) याबाबतची बातमी दिनांक ०७/०१/२०२५ रोजीच्या ऑनलाईन वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती.

मा. परिवहन मंत्री महोदय यांनी दिनांक ०६/०१/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मा. केंद्रीय मंत्री (रस्ते वाहतूक व महामार्ग) यांच्या समोर मुंबई विभागात Rope-Way वाहतूक ही संकल्पना मांडली असून यास मान्यता मिळाल्यास मा. केंद्रीय मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली त्याअनुषंगाने सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात येईल.

मा.मंत्री (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०१/२०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तानुसार मुंबई महानगर प्रदेशामध्ये Water Metro, Rope Way, Pod Taxi उभारण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियम तयार करण्याबाबत व एमएमआरडीए यांनी सर्व्हे करुन प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत तसेच नगर विकास विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातुर ते नांदेड ब्रॉडगेज रेल्वे सुरु करणेबाबत

**(२२) ३१६० (२५-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर ते नांदेड येथे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी विद्युतीकरणासह नविन रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर व्यवहार्हता अहवाल दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान शासनास सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने शासनाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या सहमतीसाठी पाठिवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी करुन सदर प्रस्तावावर केंद्र शासनाकडून अद्यापही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१९-०५-२०२६) :** (१) होय.
(२) व (३) लातूर ते नांदेड या रेल्वे मार्ग प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत जमिनीच्या अधिग्रहणासह रु.३०१२ कोटी इतकी असुन त्यापैकी ५० टक्के खर्च म्हणजेच रु.१५०६ कोटी इतका राज्य शासनाचा सहभाग व उर्वरित ५० टक्के रेल्वे मंत्रालयाच्या वित्तीय सहभागास तत्वत: मान्यता देण्याबाबत रेल्वे बोर्डास दिनांक १४ जुलै, २०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. त्यानंतर, रेल्वे बोर्डाला दिनांक १४/०२/२०२५ रोजी स्मरणपत्र देखील पाठविले आहे.

केंद्र शासनाच्या रेल्वे विभागाने कळविल्यानुसार, सदर प्रकल्पाचा अंतिम स्थान सर्वेक्षण करण्यास मंजुरी देण्यात येत असल्याबाबत रेल्वे बोर्डाने महाव्यवस्थापक, दक्षिण-मध्य रेल्वे, सिकंदराबाद यांना दिनांक

०६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकल्प रेल्वे मंत्रालयाच्या मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्हयासह बऱ्याच महामार्गावर शेतमाल वाहतुक करणाऱ्या शेतकऱ्यांची होत असलेली अडवणूक

**(२३) ३३७५ (२७-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरळीतपणे चालावी, अपघात होऊ नयेत, अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना वेळेत मदत मिळावी यासाठी प्रादेशिक परिवहन विभाग व पोलीस कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील बीड महामार्ग, मुरुड-पुणे मार्ग तसेच राज्यातील राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्ग याठिकाणी कर्तव्यावर असलेल्या संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आठवडी बाजारात आपला शेतमाल आणणारे शेतकरी तसेच लहान मोठे व्यापारी यांच्या वाहनांना अडवून क्षमतेपेक्षा अधिकची वाहतूक केली जात असल्याने त्यांच्याकडून अतिरिक्त दंडाची भीती दाखवून आर्थिक लुट होत असलेल्या प्रकारात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित प्रादेशिक परिवहन विभागातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०४-२०२६) :** (१) होय.
(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर कार्यालयाकडून अंमलबजावणी व रस्ता सुरक्षा विषयक कामकाज करण्यासाठी दरमहा ०६ वायुवेग पथके तालुकानिहाय नियुक्त केले जातात. सदर वायुवेग पथकास तपासणीसाठी तालुके निश्चीत करून दिली जातात. वायुवेग पथके मोटार वाहन निरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असतात.

एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर, व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, उद्गीर कार्यालयाच्या वायुवेग पथकाकडून मालवाहू वाहनातून भार क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दोषी वाहने | वसूल केलेले तडजोड शुल्क (रु.) लक्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर | ९०८ | २२४.५८ |
| २. | उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, उदगीर | ३३ | ९.५७ |

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यालयाच्या वायुवेग पथकाकडून मालवाहू वाहनातूर भार क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी अहवाल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दोषी वाहने | वसूल केलेले तडजोड शुल्क (रु.) लक्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे | १६३९ | ४७७.९६ |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात महावितरण कंपनीला शासनाकडून नव्याने उपकेंद्र स्थापन करण्यासाठी निधी वितरित करण्यात आल्याबाबत**

**(२४) ४०३० (२७-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात नव्याने वीज उपकेंद्र स्थापन करण्याकरीता शासनाकडून निधी वितरित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूर करण्यात आलेल्या निधीतून उपकेंद्र कोणत्या गावात स्थापित करण्यात आला असून, सदर ठिकाणी जागा उपलब्ध करण्यात आली आहे काय,
(३) तसेच सदर प्रकरणी संबधित विभागाकडून निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

"नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा सुविधेची कामे करणे (महानगरपालिका)" नागरी स्थानिक संस्थाना सहाय्यक अनुदान या योजनेअंतर्गत शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२४ नुसार अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभागनिहाय महावितरण कंपनीशी संबंधित रु.११.०० कोटी इतक्या रकमेची वीज वितरण यंत्रणा सक्षमीकरणाची नवीन रोहीत्र बसविणे, रोहीत्राची क्षमता वाढविणे, नवीन विद्युत खांब उभारणे, विद्युत खांब स्थानांतरीत करणे, विद्युत केबल टाकणे इ. समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तथापि, यामध्ये नवीन ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्राकरीता तरतुद करण्यात आलेली नाही.

तथापि, अमरावती जिल्हयातील वीज ग्राहकांना दर्जेदार व सुरळीत वीज पुरवठा मिळावा याकरीता पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याचे लक्ष्य निर्धारीत करुन सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत एकूण ४० नवीन ३३/११ के.व्ही वीज उपकेंद्रे प्रस्तावित केलेली असून, त्यातील २७ नवीन ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्रांची उभारणी ए.डी.बी. (आशियाई विकास बॅंक यांच्या अर्थसहाय्यातून) योजनेमधून करण्याचे प्रस्तावित आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भडगांव (जि. जळगांव) तालुक्यातील मंदिर परिसराचा प्रादेशिक पर्यटनांतर्गत विकास करण्याबाबत**

**(२५) ४१५६ (२७-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यात भडगांव तालुक्यात साई मंदिर, गुढे येथे श्रीकृष्ण मंदिर, शिंदी येथे जुने खंडेराव महाराज मंदिर, लोण पिराचे येथे विठ्ठल मंदिर व सावता महाराज मंदिर आणि तलाव परिसराचा प्रादेशिक पर्यटनांतर्गत विकास करुन निधी मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व पर्यटन मंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२९-०६-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) प्रादेशिक पर्यटन विकास योजना शासन निर्णय दिनांक ०४/११/२०१० मधील तरतूदीनुसार जळगांव जिल्ह्यातील भडगांव तालुक्यातील साई मंदिर, गुढे येथे श्रीकृष्ण मंदिर, शिंदी येथे जुने खंडेराव महाराज मंदिर, लोण पिराचे येथे विठ्ठल मंदिर व सावता महाराज मंदिर आणि तलाव परिसराचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समितीच्या दिनांक १७/१०/२०२५ च्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. तथापि, निधी उपलब्ध नसल्याने त्यास समितीची मान्यता प्राप्त झाली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात व वाशिम जिल्ह्यात एसटी बसगाडयांच्या संख्येत वाढ करण्याबाबत**

**(२६) ४३९८ (०८-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) महिलांसाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देणारी योजना सुरु केल्याने महिलांच्या प्रवासी संख्येत मोठी वाढ होऊन एसटी महामंडळाचा आर्थिक फायदा झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांच्या प्रवाशांची संख्या वाढली तरी बसगाडयांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याने ग्रामीण भागात बसगाडयांची संख्येत वाढ करावी अशी मागणी महिला प्रवाशांकडून होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नाची दखल घेऊन वाशिम जिल्हयात तसेच राज्यातील ग्रामीण भागात एसटी बसगाडयांच्या संख्येत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१३-०७-२०२६) :** (१) महिला सन्मान योजने अंतर्गत एस.टी.च्या सदर योजनेमुळे रा.प.बसेस मधून प्रवास करणाऱ्या महिला प्रवासी संख्येत वाढ झाली आहे.
(२), (३) व (४) रा.प.महामंडळाच्या स्वमालकीच्या २६४० नवीन साध्या बसेस प्राप्त झाल्या असून त्याचे विभाग/आगारांना आवश्यकतेनुसार वाटप करण्यात आले आहे. तसेच नविन ३००० बसेस घेण्यात येत आहेत.

वाशिम जिल्ह्यात रा.प.महामंडळाच्या दैनंदिन १६४ नियते चालनात असून या नियतांसाठी आगारांमध्ये १७४ बसेस उपलब्ध आहेत. तसेच लोकप्रतीनिधी यांची मागणी व आवश्यकतेनुसार वाशिम जिल्हयास २० नवीन बसेस वाटप करण्यात आलेले आहेत.

---

## भिवंडी, जि.ठाणे येथे एस टी बस स्थानक नूतनीकरण व उभारणी करण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्याबाबत

**(२७) ४४४५ (२७-०४-२०२५). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, जि.ठाणे येथे एस टी बस स्थानक नूतनीकरण व उभारणी करण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यास विलंब होत असून तातडीने निविदा प्रक्रिया करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०२५ मध्ये मा. मंत्री परिवाहन यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील एस टी बस स्थानके ६० वर्षे भाडेतत्वावर उभारण्याचा निर्णय घेतला असून अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भिवंडी एस टी बस स्थानकाच्या संदर्भात दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१५-०७-२०२६) :** (१) होय

(२), (३) व (४) रा. प. महामंडळाच्या जागा ६० वर्षाऐवजी सार्वजनिक खाजगी सहभागांतर्गत (PPP) ४९+४९ असे एकूण ९८ वर्षांकरीता विकसीत करण्याबाबत दिनांक १/९/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. सद्यस्थितीत रा. प. महामंडळाचे भिवंडी बसस्थानकाची पुनर्बांधणी शासन निधीतून करणे प्रस्तावित आहे. त्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे.

---

## पुणे व नाशिक सेमी हायस्पिड हायवे प्रकल्पाकरिता खेड, आंबेगाव व जुन्नरगाव या तालुक्यामधून रेल्वेमार्गाकरिता जमीन संपादन करण्याबाबत

**(२८) ४५७३ (२९-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व नाशिक येथील सेमी हायस्पीड हायवे प्रकल्पाकरिता खेड, आंबेगाव व जुन्नरगाव या तालुक्यामधून रेल्वेमार्गाकरीता जमीन संपादन करण्यासाठी पुणे शहरातील ३ गावे, हवेली १२, खेड २१, आंबेगाव १० व जुन्नर ८ अशा एकूण ४२ गावातील जमीनींची मोजणी पूर्ण करुन काही शेतकऱ्यांना २५० ते ३०० कोटी रुपयांचे वाटप करुन शासनाने जमीन ताब्यात घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प खेड, आंबेगाव व जुन्नर ऐवजी नगर-शिर्डी-नाशिक करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, खेड, आंबेगाव, जुन्नर व पुणे जिल्ह्यातील प्रस्तावित मार्गात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनींची नोंदणी व काही शेतकऱ्याना देण्यात आलेले पैसे या सर्वाकरिता झालेला खर्च वाया जाणार आहे काय तसेच या सर्व भागातील शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर मारलेले शिक्के शासन काढून टाकणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर सेमी हायस्पीड रेल्वेचे काम सुरु होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१५-०६-२०२६) :** (१) महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास महामंडळ लि. (MRIDC) (महारेल) ने तयार केलेल्या आरेखनानुसार, पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेमार्ग पुणे शहरातील ३

गावे, हवेली १२, खेड २१, आंबेगाव १० व जुन्नर ८ अशा एकूण ५४ गावांमधून प्रस्तावित आहे. त्यापैकी उपविभागीय अधिकारी, खेड यांच्या कार्यालयाकडील एकूण २१ गावांपैकी ८ गावांची संयुक्त मोजणी पूर्ण होऊन मा. जिल्हास्तरीय समितीत सदर गावांची नुकसान भरपाई मोबदला दर निश्चित होऊन एकूण २७.६० कोटी रुपये शेतकऱ्यांना वाटप करुन सदर जमिनीचे थेट वाटाघाटीने खरेदीदस्त करण्यात आलेले आहे. तसेच, जिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.४ पुणे या कार्यालयाकडील हवेली तालुक्यातील एकूण १२ गावांपैकी ९ गावातील अंतिम मोबदला निश्चित केला असून त्यापैकी ६ गावांमध्ये खरेदीखत झालेले असून एकूण रुपये २०१,०७,६६,२०१/-वाटप करण्यात आलेले आहे. याप्रमाणे पुणे जिल्ह्यात एकूण रुपये २२८,६७,९४,८४१/- इतके वाटप करण्यात आले आहे.

सद्यःस्थितीत, सदर प्रकल्पास अंतिम मंजुरी मिळेपर्यंत मोजणीचे काम तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात यावे असे सक्षम प्राधिकारी यांना आदेश द्यावेत, असे महारेलने दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविले आहे.

(२) (३) व (४) महारेलने प्रस्तावित केलेल्या आरेखनामुळे, जायन्ट मिटरवेव्ह रेडियो टेलिस्कोप (GMRT) ऑब्झर्व्हेटरीच्या अँटेनास व्यत्यय येत असल्यामुळे नॅशनल सेंटर फॉर रेडियो अॅस्ट्रोफिजिक्स (NCRA) यांचेकडून प्रकल्पाच्या आरेखनाला विरोध होत आहे. त्यामुळे रेल्वेबोर्डाने सध्या अस्तित्वात असलेले भारतीय रेल्वेमार्गाचे जाळे जे अधिक किफायतशीर आहे, त्याचा वापर करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे सदर प्रकल्प महारेलकडून राबविण्यास दिलेली प्राथमिक तत्वतः मान्यता काढून घेण्यात येत असल्याबाबत व सदर प्रकल्पावर अधिक खर्च न करण्याची काळजी घेण्याबाबत दिनांक २१/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, महारेलला कळविले आहे.

सद्य:स्थितीत, सदर प्रकल्प मध्य रेल्वेकडून राबविण्यात येत आहे. मध्य रेल्वेने सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महारेलच्या DPR च्या आधारे सुधारीत केला असून दिनांक १८/१२/२०२३ रोजी रेल्वे बोर्डाला सादर केला आहे. संगमनेर मार्गे पुणे-नाशिक सेमी हाय-स्पीड रेल्वे लाईन प्रकल्पाचे प्रस्तावित संरेखन सुधारित करण्यात आले असून सुधारित संरेखन GMRT अँटेनाच्या सर्वात बाहेरील अँटेनापासून १२-१३ किमी अंतरावर आहे. वरील संरेखन बदल देखील ०५/०१/२०२४ रोजी डायरेक्टरी / GMRT ला कळवण्यात आला आहे. त्यानुसार मध्य रेल्वेने तयार केलेला डीपीआर रेल्वे बोर्डाच्या विचाराधीन आहे.

रेल्वे हा विषय केंद्रीय सुचीमध्ये समाविष्ट असून, महाराष्ट्र राज्यात नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्याची प्राथमिक जबाबदारी ही केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाची आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील अंकाई- टंकाई किल्ल्याच्या संवर्धनाबाबत

**(२९) ४८४४ (२५-०४-२०२५) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील अंकाई किल्ल्याचा पर्यटन संचालनालयाच्या डेस्टीनेशन डेव्हलपमेंट मोहिमेमध्ये समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंकाई-टंकाई जोड किल्ले राज्य संरक्षित स्मारक घोषित करुन जिल्हा वाषिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३ टक्के निधी संवर्धनासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०७-०४-२०२६) :** (१) व (२) होय
(३) अंकाई किल्ला, अंकाई, ता. येवला, जि. नाशिक हे राज्य संरक्षित स्मारक असून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत रु.१,३४,३०,४१०/- इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळाली असून सदर काम सुरु आहे.

तसेच टंकाई किल्ला, अंकाई, ता. येवला, जि. नाशिक या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्ती कामाचे रु. २,६६,९२,४६८/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) वर्ष २०२५-२६ अंतर्गत मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील चित्रपटगृहे सद्य:स्थितीत बंद असल्याबाबत

**(३०) ४८९२ (२७-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १४०० चित्रपटगृहांपैकी ९०० चित्रपटगृहे सद्य:स्थितीत बंद पडली असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी असणारे परवानग्यांचे नियम, वार्षिक एनओसी, करांचे ओझे आणि पुनर्विकासावरील निर्बंध यामुळे एक पडदा (सिंगल स्क्रीन) थिएटर मालकांना मोठया अडचणींना सामोरे जावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चित्रपटगृहाच्या मालकांना परवाना हस्तांतर करण्यासही बंदी असून, नवीन खरेदीदारालाही पूर्ण प्रक्रिया नव्याने करावी लागत असल्याने परवान्यांसाठीही मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो, मालकांना भेडसावणाऱ्या जाचक अटी दूर करुन सवलती देण्याची मागणी व आर्थिक मदत करावी अशी मागणी एक पडदा चित्रपटगृहांचे मालक व लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०२५) :** (१) राज्यातील एकूण ५११ एकपडदा चित्रपटगृहांपैकी सद्य:स्थितीत ३१० चित्रपटगृहे कार्यरत असून, २०१ चित्रपटगृहे बंद स्थितीत आहेत.
(२) व (३) सिनेमा ओनर्स अँड एक्झिबिटर्स असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई यांनी चित्रपटगृहांच्या समस्यांबाबत सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तत्कालीन मा. राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने सादर केलेल्या अहवालातील गृह विभागाशी संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सहा नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधा केंद्र सुरू करण्यात येत असल्याबाबत

**(३१) ४९१४ (२५-०४-२०२५) श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जुन्या व निरुपयोगी वाहनांचे निष्कासन करण्यासाठी सहा नोंदणीकृत वाहन निष्कासन सुविधा केंद्र

सुरू करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणत्या ठिकाणी ही वाहन निष्कासन केंद्र सुरू करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, सदर केंद्रामध्ये जुने निरुपयोगी वाहन निष्कासित केल्यास वाहन धारकाला शासन काही सुविधा व वाहन निष्कासित केल्यावर त्याचा संपूर्ण तपशील ऑनलाइन नोंद करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०४-२०२६) :** (१) होय.
(२) मान्यता देण्यात आलेल्या केंद्राची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| १. | दरेगांव, जालना |
| २. | कामठी, नागपूर |
| ३. | कामठी रोड, नागपूर |
| ४. | दौंड, पुणे |
| ५. | खेड, पुणे |
| ६. | राजगुरु नगर, पुणे |
| ७. | चाकण, पुणे |
| ८. | वाडा, पालघर |

(३) व (४) शासनाने दिनाक १७/०१/२०२३ च्या अधिसूचनेद्वारे वाहन धारकांना RVSF केंद्रामध्ये वाहन निष्कासित केल्यास खालील प्रमाणे लाभ घोषित केले आहेत.

१. निष्कासन नियमानुसार ठेवीचे प्रमाणपत्र (CoD) सादर करणाऱ्या नविन नोंदणीकृत वाहनांना करामधून सूट देणे. (दिनांक २१/०५/२०२५ च्या अधिसूचनेनुसार १५ टक्के सूट) ठेवीचे प्रमाणपत्र (CoD) हे व्यापार करण्यायोग्य (Tradable) आहे.

२. निष्कासीत होणाऱ्या वाहनांवरील पर्यावरण कर व त्यावरील व्याज तसेच देय करावरील व्याज माफ करणे.

RVSF केंद्राद्वारे वाहन निष्कासित केल्यावर सदर वाहनाच्या निष्कासनाबाबतची माहिती ऑनलाईन वाहन प्रणालीवर नोंद घेण्याबाबत आवश्यक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकापूर (जि.कणकापूर, जि.मालेगांव) येथे दिवसा सुरळीत वीज पुरवठा करण्याबाबत

**(३२) ४९४२ (२५-०४-२०२५) श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकापूर (जि.कणकापूर, जि.मालेगांव) येथील युवा शेतकरी श्री.दीपक संजय बच्छाव हा दिवसा वीजपुरवठा करण्यात येत नसल्याने दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास घराच्या शेतात कांद्यांना पाणी देण्यासाठी गेला असता त्यांचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजपुरवठा सुरळीत नसल्याने व विजेचा पुरवठा करण्याची वेळ चुकीची ठरल्याने युवा शेतकऱ्यांचा मृत्यु झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वीज वितरण कंपनीने दिवसा सुरळीत वीजपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) कणकापुर गावातील शेतकरी श्री. दिपक संजय बच्छाव हे दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास शेतात गेले असता, त्यांचा विहिरीत पडुन मृत्यु झाल्याची घटना घडलेली आहे. तथापि, सदर घटनेशी महावितरण कंपनीचा कोणताही संबंध नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कणकापुर गावामध्ये ३३/११ के.व्ही. खर्डे उपकेंद्रामधून ११ के.व्ही. काचणे कृषी वाहिनीद्वारे शेतीसाठी ८ तास दिवसा व रात्री चक्राकार पद्धतीने थ्री फेज वीज पुरवठा केला जातो.

"मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०" या योजनेअंतर्गत देवळा उप विभामाध्ये ६ उपकेंद्रामधील, एकूण ६७ मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे. सदर क्षमता कार्यान्वित झाल्यानंतर ३१ कृषी वाहिन्यांवरील एकूण १३४०३ कृषीपंपाना दिवसा वीज पुरवठयाचा लाभ होणार आहे. सद्यस्थितीत, देवळा उपविभामाध्ये १७ मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत. यामध्ये ३ उपकेंद्रांमधील एकूण १९ कृषी वाहिन्यांवरील ५६६७ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठयाचा लाभ होत आहे.

तसेच, ११ के.व्ही. काचणे कृषीवाहिनीवर शेतीसाठी फक्त दिवसा वीज पुरवठा करण्याकरीता ३३/११ के.व्ही. खर्डे उपकेंद्रांमध्ये "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०" या योजनेंतर्गत १० मे. वॅ. क्षमतेच्या नवीन सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, सदर उपकेंद्रामध्ये ५ MVA च्या जागी १० MVA चा रोहित्र बसविण्यात आलेला आहे. सदर १० मे.वॅ. क्षमतेचा सौर उर्जा प्रकल्प सुरु झाल्यानंतर कणकापुर गावातील कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठ्याचा लाभ होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नेवाळी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे नविन सुसज्ज पोलिस स्टेशन मंजूर होणेबाबत

**(३३) ४९४३ (२५-०४-२०२५). श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण भागात चोरी, खुन, लुटमारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने नेवाळी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) नवीन सुसज्ज पोलिस स्टेशन मंजूर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महापालिका क्षेत्रातील कल्याण पूर्व विभाग, उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील कॅम्प -४ नव्याने महापालिका क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा व अंबरनाथ तालुक्यातील गावांचा समावेश असून याकरिता केवळ कोळशेवाडी पोलिस स्टेशन, विठठलवाडी पोलिस स्टेशन व हिल लाईन पोलिस स्टेशन या तीन पोलिस स्टेशनचा समावेश असून याचे अंतर खूप असल्याने नागरिकांना गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या सोयीकरिता नेवाळी येथे नविन सुसज्ज पोलिस स्टेशन मंजूर करुन जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

नेवाळी (ता. अंबरनाथ, जि.ठाणे) येथे नवीन सुसज्ज पोलिस स्टेशन मंजूर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी २९ जानेवारी, २०२५ रोजी केलेला पत्रव्यवहार जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांच्याकडे केला आहे.

तसेच, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ठाणे जिल्हा यांच्याकडे नेवाळी (ता. अंबरनाथ, जि.ठाणे) येथे नवीन सुसज्ज पोलिस स्टेशन मंजूर करण्याकरीता निवेदन सादर केले आहे.
(२) व (३) नागरिकांच्या सोईकरिता नेवाळी येथे नवीन पोलीस ठाणे सुरु करण्याच्या अनुषंगाने पोलीस ठाण्याकरिता जागा निश्चितीबाबतची कार्यवाही तहसिलदार, अंबरनाथ यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि. पुणे) येथील राज्य परिवहन आगाराच्या मुख्य बसस्थानकाचे विश्रामगृह बांधकाम व बस स्थानकातील अंतर्गत कॉक्रीटीकरणासाठी निधी मिळणेबाबत

**(३४) ५०८६ (२५-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) येथील राज्य परिवहन आगाराच्या मुख्य बसस्थानकाचे विश्रामगृह बांधकामास व बस स्थानकातील अंतर्गत कॉक्रीटीकरण करण्यासाठी निधीसह मान्यता मिळणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१४-०७-२०२६) :** (१) होय.
(२) व (३) पुणे विभातील दौंड बसस्थानकाचे व आगाराचे नुतणीकरण/ पुनर्बांधणी करणे या कामास रु.७ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

---

## दौंड (जि. पुणे) प्रलंबित उपकेंद्रे, क्षमतावाढ, अतिरिक्त रोहित्रे तातडीने होणेबाबत

**(३५) ५१२५ (२५-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) येथील प्रलंबित उपकेंद्रे, क्षमतावाढ, अतिरिक्त रोहित्रे तातडीने होण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) दौंड (जि.पुणे) विधानसभा मतदारसंघातील वीज पुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी 'सुधारित वितरण क्षेत्र योजनेमधील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०) अंतर्गत देऊळगाव राजे व रावणगाव या उपकेंद्रांमध्ये कार्यरत रोहित्रांची क्षमतावाढ करण्यात आलेली असून, मलठण उपकेंद्रांमधील कार्यरत रोहित्रांची क्षमतावाढ करण्याचे काम सुरु आहे.

तसेच, ADB योजनेअंतर्गत केडगाव विभागात भांडगांव, वडगांवबांडे, सोनवडी, खुटबाव व देऊळगांव गाडा या ५ ठिकाणी नवीन उपकेंद्रे मंजूर करण्यात आली आहेत. सदर कामांची निविदा प्रक्रिया सुरु असून, निविदा प्रक्रियेनंतर सदरची कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात शेतीपंपांसाठीची वीजजोडणी प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ५२२१ (२५-०४-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात ८ हजार २४१ शेतीपंपांसाठीची वीजजोडणी प्रलंबित राहिली असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येत्या वर्षभरात शेतीपंपांना वीजजोडणी देण्याबाबतचा आराखडा जिल्हास्तरावर बनविण्यात आला असून प्रलंबित शेतीपंपांना वीज जोडणीसाठी निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित शेती पंपांसाठीची वीजजोडणी शेतकऱ्यांना तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयात माहे एप्रिल-२०१८ पासून कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० या योजनेअंतर्गत जिल्हयात पारंपारिक पध्दतीने ३७,००४ शेतीपंपांना वीज जोडणी देण्यात आलेली आहे. जिल्हयात सद्यस्थितीत शेतीपपांची वीज जोडणी प्रलंबित नसून, सौर कृषीपंप प्राधान्याने देण्याचे काम सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, सोलापूर जिल्हयातील सर्व कृषीपंप वीज जोडण्यांना मागेल त्याला सौर कृषीपंप तसेच कुसुम-बी या योजनांच्या माध्यमातून दिवसा वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सौर कृषीपंपांद्वारे वीजपुरवठा करण्यात येत आहे. या उद्देशासाठी राज्य शासनाकडून आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून, त्यानुसार संबंधित योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) कृषीपंप ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी येणारा खर्च, तसेच विद्युत पंपांना कमी दाबाने वीज पुरवठा होणे, वारंवार वीज पुरवठा खंडीत होणे, तांत्रिक वीज हानी वाढणे, विद्युत अपघात, वीज चोरी यासारख्या समस्यांमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीज पुरवठा करण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होतात याला पर्याय म्हणून राज्यात शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहित सौर कृषीपंप उपलब्ध करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १२.०५.२०२१ अन्वये कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषीपंप या योजनेमधून सौर पंपाद्वारे वीज पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेळघाट क्षेत्र धारनी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील गावांमध्ये नवीन डी.पी. बसविण्याकरीता निधी मंजूर करण्याबाबत

**(३७) ५२८६ (२५-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट क्षेत्र धारणी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील २२ गावामध्ये अद्यापपर्यंत विजेचा पुरवठा होत नसल्याने, जिल्ह्यात कृषी पंप वीज जोडणी करण्याठी ६७२ नवीन डी.पी.बसविण्याकरीता निधी मंजूर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांना दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी ई-मेलद्वारे लेखी पत्र पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर गावांपैकी चोपन व माखला (टेंभुर्नी ढाणा) या गावांमध्ये महाऊर्जामार्फत मायक्रोग्रीड प्रकल्प आस्थापित करण्यात आला आहे. NGO मार्फत कुंड, खामदा, किन्हीखेडा, खोपमार व रक्षा या ५ गावांमध्ये सौर मायक्रोग्रीड प्रकल्प उभारण्यात आले असून, सद्य:स्थितीत सदर प्रकल्पांकरिता महाऊर्जामार्फत दुरुस्ती व क्षमतावाढ प्रस्तावित आहे. तसेच, सदर गावांमध्ये केंद्र शासनाच्या सौभाग्य योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये ५ वर्षे देखभाल दुरुस्ती कालावधीसह महाऊर्जामार्फत वैयक्तिक सौर घरगुती दिवे प्रणाली आस्थापित करण्यात आलेली आहे. मेळघाट येथील सदर गावांमध्ये पारंपारिक पद्धतीने विजपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या उभारणीकरीता निधीच्या मंजुरीसंदर्भात व वन परवानगीसंदर्भात कार्यवाही प्रगतीत आहे. मौजे रायपूर, बोराट्याखेडा, माखला (टेंभुर्नी ढाणा वगळून) व बिच्छुखेडा येथे महाऊर्जामार्फत सौर मायक्रोग्रीड प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित करण्याकरिता ई-निविदा प्रगतीपथावर आहे. उर्वरीत गावांमध्ये सौर मायक्रो ग्रीड प्रकल्प आस्थापित करण्याकरिता महाऊर्जाकडून ई-निविदा कार्यवाही करण्यात येत आहे.

अमरावती जिल्हयामध्ये सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये जिल्हा नियोजन समितीद्वारे १८५६ नविन ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) मंजूर झालेले असून त्याकरीता १४३.९७ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये मंजूर झालेल्या नविन ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) ची कामे पूर्ण झालेली आहेत. सन २०२४-२५ मध्ये ३९९ रोहित्रांची एकुण रुपये २९.४२ एवढी कामे पुर्ण झालेली आहेत. सन २०२४-२५ मधील उर्वरीत व २०२५-२६ मध्ये प्रस्तावित नविन एकुण २८९ रोहित्र रक्कम रु.३२.८४ कोटीची कामे प्रस्तावित असुन, सदर कामे प्रगतीपथावर असून, त्यामुळे कृषी वीज पुरवठा यंत्रणेचे सक्षमीकरण होणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालम (जि.परभणी) तालुक्यातील गोदावरी नदीपात्रावर असलेल्या जांभुळबेट पर्यटन स्थळाचा नवीन विकास आराखडा तयार करुन पर्यटनाला चालना देण्याबाबत

**(३८) ५३५६ (२५-०४-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) तालुक्यातील गोदावरी नदीपात्रावर असलेल्या जांभुळबेट पर्यटन स्थळाचा नवीन विकास आराखडा तयार करुन पर्यटनाचा चालना देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, पर्यटन मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०९-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संचालक, पर्यटन संचालनालय यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल.

---

## गंगाखेड (जि.परभणी) येथील विद्युत महावितरण अंतर्गत विविध कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) ५३६१ (२६-०४-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यासह गंगाखेड येथील विद्युत महावितरण अंतर्गत स्वतंत्र फिडर, नवीन ट्रान्सफार्मर इत्यादी विविध विकास कामे वेळेवर होत नसल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील विशेषत: गंगाखेड विधानसभा क्षेत्रातील बहुतांश भागात शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध असतांना तसेच कृषीपंपासाठी वीज पुरवठ्याची गेल्या ३-४ वर्षापासून मागणी करुनही त्यांना विद्युत जोडणी देण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्युत महावितरण, परभणी अंतर्गत विविध कामे करण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री तथा उर्जामंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही,

परभणी जिल्ह्यातील गावठाण व कृषिवाहिनी विलगीकरण करण्याकरीता केंद्र शासन पुरस्कृत सुधारीत वितरण योजना (RDSS) योजनेअंतर्गत मे.अशोका बिल्डकॉन, लि. नाशिक यांना कार्यादेश देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेअंतर्गत ४४% काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे त्वरीत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीमार्फत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषिपंप ग्राहकांना जेष्ठता यादीनुसार वीज जोडण्या देण्यात येत होत्या. राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने "मागेल त्याला सौर कृषी पंप" ही पर्यावरणपूरक योजना सुरु केली आहे व शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

गंगाखेड विधानसभा क्षेत्रामध्ये "मागेल त्याला सौर कृषी पंप" योजनेअंतर्गत एकूण १२३५८ लाभार्थ्यांनी पैसे भरणा केले असून, त्यापैकी ११४९५ लाभार्थ्यांनी पुरवठादाराची निवड केली आहे व ८६५१ लाभार्थ्यांना सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत. तसेच, उर्वरीत सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे काम सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेमध्ये समाविष्ट होण्याकरीता महावितरणमार्फत पाठपुरावा सुरु आहे. तसेच त्यांना "मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेत प्राधान्याने सौर कृषी पंप देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ शहरातील नव्याने उभारलेल्या बस स्थानकांची दुरवस्था सुधारण्याबाबत

**(४०) ५४०५ (०८-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहर हे जिल्हयाचे मुख्यालय असून त्याठिकाणी शासनाने कोटयवधी रुपये खर्च करुन नवीन बस स्थानक उभारले, परंतु काम अपूर्ण अवस्थेत असताना विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीपूर्वी घाईघाईने बस स्थानकाचे लोकार्पण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत त्याठिकाणी प्रवाशांसाठी सोयीसुविधांचा अभाव असून फलाटावर नाव नाही, स्वच्छतालय बंद, कॅन्टीन नाही इत्यादी सुविधांअभावी या स्थानकांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नव्याने लोकार्पण झालेल्या बस स्थानकांची दुरवस्था सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१३-०७-२०२६) :** (१), (२), (३) व (४) यवतमाळ येथील जुने बसस्थानकाची इमारत पाडून संपुर्ण वाहनतळाचे काँक्रीटीकरण, प्रवाशांकरीता प्रशस्त तळघरातील वाहनतळ, तसेच प्रवाशांसाठी आवश्यक सर्व सोयीसुविधेने युक्त १७ फलाटांचे सुसज्ज बसस्थानक बांधुन दिनांक १४/१०/२०२४ रोजी लोकार्पण करण्यात आले. सदर बसस्थानकावरील नविन इमारतीमध्ये बसस्थानक प्रमुख कार्यालय, चौकशीकक्ष, पास वितरण व आरक्षणकक्ष, हिरकणीकक्ष, पार्सल कक्ष, १० दुकानगाळे, उपहारगृह, प्रवाशांकरीता पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह, पोलीसचौकी, रा.प.चालक-वाहक यांच्यासाठी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृह, एस.टी. बँकेसाठी आस्थापना इत्यादी समाविष्ट आहेत.

सदर बसस्थानकाचे नविन वास्तुमध्ये ०१ उपहारगृह, ०१ दुचाकी वाहनतळ, ०१ स्नॅकबार (मोकळ्या जागेत) कार्यान्वित आहेत.

---

**छत्रपती संभाजीनगर पोलिस आयुक्तालय हद्दवाढ प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ५८७४ (२६-०४-२०२५) श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर पोलिस आयुक्तालयाची हद्दवाढ आणि तीन नवीन पोलिस ठाण्याचा प्रस्ताव शासनाकडे गत ५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गेल्या आठ वर्षामध्ये पोलिस आयुक्तालय हद्दीमध्ये एकही नवीन पोलीस ठाणे झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील कायदा व सुव्यवस्थेचा गेल्या आठ ते दहा वर्षातील वाढता कल पाहता सदरील प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाची हद्दवाढ करण्याचा प्रस्ताव दिनांक ०३/०६/२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. सदर हद्दवाढ करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व शेंद्रा एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करण्याच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २७/०९/२०२३ अन्वये अधिकची माहिती मागविण्यात आली होती. सदरील माहिती शासनास अद्याप अप्राप्त आहे.

तसेच रांजणगाव (शे.पु.) पोलीस ठाणे निर्मितीच्या प्रस्तावाबाबत पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावरुन कार्यवाही चालू आहे. तसेच, शेंद्रा क्षेत्र व चिकलठाणा पोलीस ठाणे हे पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यक्षेत्रात आणण्याबाबत व शेंद्रा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या त्रुटींची माहिती अद्याप शासनास सादर करण्यात आलेली नाही.

(२) पोलीस आयुक्त, छ. संभाजीनगर यांच्या आस्थापनेवर शासन निर्णय दिनांक १२/६/२०१७ अन्वये वेदांतनगर पोलीस ठाणे व पुंडलीकनगर पोलीस ठाणे निर्माण केली आहेत.

(३) छ. संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दवाढ करण्याच्या दिनांक ०३/०६/२०२२ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली आहे, सदरहु माहिती अद्याप शासनास अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनखेड (जि.नांदेड) येथे महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाचा एसटी थांबा करण्याबाबत**

**(४२) ६०८३ (२६-०४-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील ४० ते ५० गावांना तालुका व जिल्ह्याला जोडण्यासाठी केंद्रबिंदू असलेल्या सोनखेड (जि.नांदेड) येथे महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एसटी थांबा घेत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनखेड येथे विविध विद्यालय, प्राथमिक शाळा, केंद्रीय प्राथमिक शाळा, पोलीस स्टेशन, आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना, पोस्ट कार्यालय विविध बँका अशी महत्त्वाची कार्यालये असूनही याठिकाणी एसटी बसचा थांबा नसल्याने नागरिकांची, विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांमध्ये एसटी थांबा सुरू करण्याकरिता नागरिकांनी व प्रवाशांनी शासनाकडे वारंवार

मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०६-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) नांदेड जिल्ह्यातील सोनखेड येथे रा.प. महामंडळाच्या नांदेड विभागातील व इतर विभागातील बसेसना थांबा पूर्वीपासूनच देण्यात आलेला आहे. सोनखेड हे गाव नांदेड लोहा या मार्गावर असुन सदर ठिकाणाहून लातूर, सोलापूर, पुणे, कोल्हापुर, कंधार, परळी, गंगाखेड जाणाऱ्या तसेच नांदेड विभागाच्याअशा किमान ३५० फेऱ्यांना थांबा देण्यात आला असून प्रवाशांची चढ उतार करण्यात येत आहे. सदर ठिकाणी पूर्वीपासूनच बसेस थांबत असल्याने प्रवाशांची व शालेय विद्याथ्यर्थ्यांची कोणतीही गैरसोय होत नाही. सदर थांबा सुरु करण्यासाठी प्रवाशांची कोणतीही मागणी रा.प. महामंडळास प्राप्त झालेली नाही. रा.प. नांदेड विभागातील सर्व आगारांना पूर्वीपासूनच सोनखेड येथे थांबा असल्याने सर्व चालक / वाहक यांना सदर थांब्यावर बसेस थांबवून प्रवाशांची चढ-उतार करणेबाबत संबंधित आगार व्यवस्थापक यांचेमार्फत सुचना देण्यात आल्या आहेत. याबाबत कोणताही विलंब झालेला नाही.

---

## राज्य परिवहन मंडळाची आर्थिकस्थिती सुधारण्यासह प्रवाशांना अत्यावश्यक व सोयी-सुविधायुक्त सेवा पुरविण्याबाबत

**(४३) ७२१० (०६-१०-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी राज्य परिवहन मंडळाच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसच्या असुविधेमुळे व आगार व्यवस्थापकांच्या नियोजनशून्य कारभारामुळे नागरिक, वृद्ध, विद्यार्थी तसेच महिला इत्यादी अनेकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विविध महानगरांत कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या परिवहन सेवा एकत्रित करुन एकाच छताखाली सुरु करण्यासाठी एकात्मिक महानगर वाहतुक प्राधिकरण स्थापन करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत आदेश दिले होते, हे ही

खरे आहे काय,
(३) असल्यास, एस टी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी बांधकाम व ॲटोमोबाईल क्षेत्रातील तज्ञांची एसटी महामंडळात सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून महामंडळाचा कारभार पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानात बदल व आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत कोणत्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत,
(४) तसेच एसटी महामंडळाची राज्यभरात ८४२ ठिकाणी १३६० हेक्टर पडीक जमीन भाडेपटटयाने देऊन टप्प्याटप्याने मोकळया जागांचा विकास करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रवासी सुरक्षितता आणि प्रशासकीय कारभारात गती आणून मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी एसटीचे स्वयंचलन करण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे नियोजन अपयशी ठरल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(६) असल्यास, १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार एसटी महामंडळाने विद्युत, सीएनजी आणि साध्या बसगाड्या वाढविणे, महसूल वाढ, अत्याधुनिक सोयी-सुविधा आणि प्रशासकीय कारभाराचे स्वयंचलन यांचा समावेश करून कृती आराखडा सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, राज्यातील एसटी महामंडळाच्या प्रवाशांना उच्च प्रतीची सेवा पुरविण्याकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञान, अत्यावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी सदरहू कृती आराखडा तातडीने कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२१-०४-२०२६) :** (१) नाही
(२) होय
(३) रा.प. महामंडळातील अतिरीक्त जमिनी सार्वजनिक खाजगी सहभागांतर्गत (PPP) तत्वावर विकसीत करणे नियोजित आहे.
(४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची एकूण जागा अंदाजे १३६० हे. असून त्यापैकी काही जागा विनावापर आहेत.
(५) रा.प. महामंडळामध्ये पुरवठा, कस्टमायझेशन, होस्टींग, अंमलबजावणी आणि देखभाल स्वयंचलन कार्यक्रम प्रकल्पासाठी ई-निविदेसाठी मे.चेन -सिस (इंडीया) प्रा.लि. यांची सेवापुरवठादार म्हणून निवड झालेली आहे. सदर सेवापुरवठादार यांचेसोबत दिनांक २५.०४.२०२४ करार झाला असून कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर स्वयंचलन प्रकल्पामध्ये वाहतूक, लेखा, भांडार व खरेदी, कर्मचारीवर्ग, यंत्र अभियांत्रिकी, विधी इ. सर्व खात्यांच्या कामकाजाचे स्वयंचलन होणार असून सद्यस्थितीत या सर्व वापरकर्ते खाते यांच्या सक्रिय सहभागातून सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे कामकाज वारकर्ता स्विकृती चाचणी (UAT) सेवापुरवठादार कंपनीकडून सुरू आहे.
(६) होय.
(७) भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या विद्युत प्रणालीवरील ५१५० ई-बसेसकरीता २० ठिकाणी चार्जिंग स्टेशनची उभारणी करण्यात आली असून बसेस पुरवठ्याबाबात्ची कार्यवाही सुरू आहे.

अत्याधुनिक सोई सुविधा अंत्रगत रा. प. प्रवाशांना मार्गावरील बसचे प्रत्यक्ष ठिकाण उपलब्ध करून देणेकरीता १५९७४ बसेसमध्ये VTS यंत्रणा बसविण्यात आली असुन, स्थानकावर येणा-या बसेसची माहिती प्रवाशांना उपलब्ध होणेकरीता राज्यातील ३२१ बसस्थानकावर ६०० PIS Screen बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच मार्गावरील प्रवाशांना रा. प. बसचे ठिकाण उपलब्ध होणेकरीता कम्पुटर ॲप google play store वर उपलब्ध असून यामार्फत अद्ययावत सुविधा देणेकरीता कार्यवाही सुरू आहे.

रा. प. महामंडळाच्या कामकाजाचे स्वयंचलान ही बाब रा. प. प्रवाशांशी निगडीत नसून, रा. प.

महामंडळाच्या अंतर्गत कामकाजाशी संबंधीत आहे.

दिनांक १/९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार रा. प. महामंडळाच्या अतिरिक्त जागा सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर विकसीत करण्या करीता ४९+४९ वर्ष भाडेपट्ट्याने देण्यास मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सुसाध्यतेनुसार प्रकल्प हाती घेण्याचे नियोजीत आहे.

---

## पालघर जिल्ह्यात सफाळे रेल्वे फाटक क्र. ४२ कायमस्वरूपी बंद केल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याबाबत

**(४४) ७२८० (०६-१०-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात सफाळे रेल्वे फाटक क्र. ४२ कायमस्वरूपी बंद केले असून पादचाऱ्यांकरिता, प्रवाशांच्या सोयीकरिता रेल्वे प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेल्वे पादचारी पुल हा खूप नागमोडी वळणाचा असल्याने अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व्यक्ती तसेच भाजी पाला घेऊन जाणाऱ्या विक्रेत्यांना यावरून प्रवास करणे त्रासदायक होत असल्याने रेल्वे प्रशासनाच्या विरोधात स्थानिकांनी दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१९-०५-२०२६) :** (१) व (२) नाही.

केंद्र शासनाच्या रेल्वे विभागाने कळविल्यानुसार, एलसी-४२ च्या जागी, मुंबई बाजूला ५३३ मीटर अंतरावर खर्च वाटप तत्त्वावर एका रोड ओव्हरब्रिजच्या (आरओबी) बांधकामास मंजुरी देण्यात आली होती आणि ते ऑक्टोबर, २०२४ मध्ये पूर्ण झाले. सदर आरओबी कार्यान्वित झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी एलसी-४२ कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे.

रेल्वे गेट क्र.४२ च्या दक्षिणेकडील तसेच उत्तरेकडील टोकावरील फुट ओवर ब्रिजच्या पायाभरणीचे काम पूर्ण झाले असून स्तंभ उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, विद्यमान मधल्या फूट ओवर ब्रिजवरील लिफ्ट दिनांक १५.११.२०२५ रोजीपासून सुरु करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर लिफ्ट प्रवाशांच्या वापरासाठी उपलब्ध आहे. पश्चिम दिशेकडील एस्कलेटरचे काम अंतिम टप्प्यात असून जानेवारी, २०२६ मध्ये ते कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे रेल्वे प्रशासनाने एलसी-४२ बंद होण्यापूर्वी रस्ता वापरकर्त्यांसाठी आरओबीसह पर्यायी अतिरिक्त व्यवस्था केली होती. तरीही, स्थानिक लोकांनी एफओबी लिफ्ट आणि एस्केलेटरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी रेल्वे प्रशासनाविरुध्द आंदोलन केले.

(३) केंद्र शासनाच्या रेल्वे विभागाने कळविल्यानुसार, दिनांक ०७.०४.२०२५ रोजी मा. खासदार/ पालघर, डीआरएम/ एमएमसीटी, डीएफसीसीआयएल, एमआरव्हीसी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीदरम्यान रेल्वेने अतिरिक्त एफओबीचे बांधकाम जलदगतीने पूर्ण करण्यात येईल आणि विद्यमान एफओबीवर लिफ्टची तरतूद सुनिश्चित करण्यात येईल असे स्पष्ट केले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बॅक रोड, मालाड (पश्चिम) येथील रस्त्यावरुन बाईकस्वार जात असतांना टेंपो चालकाने केलेला अपघात**

**(४५) ७७०१ (०८-०९-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बॅक रोड, मालाड (पश्चिम) येथील रस्त्यावरुन बाईकस्वार जात असतांना टेंपो चालकाने दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास अपघात केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अपघातग्रस्ताच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) गोरेगाव वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी बॅक रोड, मालाड , पश्चिम, मुंबई याठिकाणी टेंपो चालकाने त्याचे ताब्यातील टेंपो बेदकारपणे चालवून बाईकस्वाराच्या मृत्युस कारणीभूत झाला म्हणून बांगुरनगर पोलीस ठाणे कडून दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी ग.र.क्र.१४८/२५ कलम २८१, १०६, ३२४ (४), १२५ (अ) भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकाना महाराष्ट्र अपघात दावा न्यायाधिकरणात दावा दाखल केल्यानंतर परस्पर विमा कंपनीकडून आर्थिक भरपाई देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील पोलिस विभागामध्ये रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) ७८१२ (१९-०९-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर पोलिस आयुक्तालय कार्यालयात ३९१ आणि नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात २ हजार १८७ नवीन पदांची गरज असल्याचे दिनांक १७ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर पोलिस आयुक्तालय आणि नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालय अंतर्गत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढलेली असल्याने कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे जिकरीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर पोलिस विभागामध्ये रिक्त असलेल्या पदांची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेऊन सदरची रिक्त पदे किती दिवसात भरण्यात येणार आहेत अशी विचारणा राज्य शासनाला करुन यासंदर्भात दिनांक २३ जून, २०२५ रोजीपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०२६) :** (१) व (२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर ३९१ व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या आस्थापनेवर २१८७ नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव शासनास दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शा.नि. दिनांक २५/०८/२०२३ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून सादर करण्यात आले होते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०८/२०२५ अन्वये पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर २६९ एवढ्या नवीन पदांसह ०४ नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच, शासन निर्णय दिनांक १४/०८/२०२५ अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या आस्थापनेवर २१६ एवढ्या नवीन पदांसह एकूण ०३ नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर दिनांक २४/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वेय पोलीस उपआयुक्त- १ पद, व सहायक पोलीस आयुक्त- २ पदे अशी एकूण ०३ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा गडचांदूर कोरपणा व जिवती या तालुक्याच्या ठिकाणी इतर मागासवर्गीय बहुजन कल्याणाचे वसतीगृह सुरू करणे बाबत

**(४७) ८०६५ (०६-१०-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, गडचांदूर, कोरपणा व जिवती या चारही तालुक्याच्या ठिकाणी इतर मागासवर्गीय बहुजन कल्याणाचे वसतीगृह सुरू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री यांना दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०६-२०२६) :** (१) होय.
(२) राज्यातील उच्च शिक्षण (व्यावसायिक / बिगर व्यावसायिक) घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयाच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे, इमारत भाडयाने घेवून कार्यान्वित करण्यास दिनांक २९/११/२०२२ व दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन, चंद्रपूर जिल्हयात मुलांसाठी १ व मुलींसाठी १ अशी २ वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत.

तालुक्याच्या ठिकाणी इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागाचे वसतीगृह सुरू करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

तथापि, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेनुसार तालुक्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग (धनगर वगळून) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भोजन भत्ता, निवास भत्ता व निर्वाह भत्त्याच्या स्वरुपात एकूण रु.३८,०००/- इतका आर्थिक लाभ थेट ठोकदराने विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील विक्रोळी (पूर्व) येथील पोलीस अधिकारी वसाहतीचे नुतनीकरण करण्याबाबत

**(४८) ८२६६ (१९-०९-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर-१ येथील पोलीस अधिकारी वसाहतीतील इमारत क्रमांक २१३ ही अत्यंत जीर्ण व मोडकळीच्या अवस्थेत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे उक्त वसाहतीमधील पोलीस अधिकारी जीव मुठीत घेऊन वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पोलीस अधिकारी वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधीत विभागास पत्रव्यवहार करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उक्त पोलीस अधिकारी वसाहतीकरीता निधी उपलब्ध करुन नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२६) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) सदरहू वसाहतीमधील दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळोवेळी करुन घेण्यात येते. तसेच या वसाहतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावात त्रुटी असल्यामुळे सदर त्रुटींची पुर्तता करण्याबाबत पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथे खनिज प्रतिष्ठानचा निधी अखर्चित असल्याबाबत

**(४९) ८४३२ (०७-१०-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड (जि.नांदेड) येथे गौण खनिज उत्खनन केले जात असलेल्या भागातील जनतेच्या आवश्यक सोयी-सुविधासाठी व इतर काही आवश्यक बाबींसाठी बारा ते तेरा कोटींचा निधी डीएमएफ अर्थात खनिज प्रतिष्ठानकडे गेल्या ४-५ वर्षांपासून प्रलंबित असून या निधीतून बाधित व अन्य भागात जनजीवनाशी निगडीत कामे करण्याची तरतूद असल्याचे दिनांक ९ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीतून बाधित क्षेत्रात जनजीवनाशी निगडीत कामे करणे आवश्यक असतांना तसे न झाल्यामुळे केवळ उत्खनन करुन बाधित क्षेत्र ओसाड करण्यात येत असल्याने व सदरचा निधी खर्च का झाला नाही याची माहिती घेण्याकरिता समितीची बैठक झाली नसल्याने हा निधी अखर्चित असल्याचे दिनांक ९ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०३-०७-२०२६) :** (१), (२), (३) व (४) जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नांदेड अंतर्गत असलेल्या जिल्हा खनिज निधी मधून दिनांक ३१/०७/२०१९ रोजी मा.पालमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली

झालेल्या बैठकीमध्ये प्रत्यक्ष बाधित क्षेत्राकरीता ४० कामे व अप्रत्यक्ष बधित क्षेत्राकरीता ११ कामे अशी एकूण ५१ कामे (रु.५.९० कोटी) मंजूर करण्यात आलेली आहेत. तद्नंतर केंद्रीय खाण मंत्रालयाच्या दिनांक १५/०१/२०२४ रोजीच्या आदेशानुसार दिनांक ११/१०/२०२४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये नियामक परिषद व व्यवस्थापकिय समितीच्या संरचनेमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांनी नियामक परिषदेवरील सदस्यांच्या नियुक्तीबाबत सादर केलेल्या प्रस्तावास दिनांक ०३/१०/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेली आहे.सद्यस्थितीमध्ये रु.११.६५ कोटी जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नांदेड अंतर्गत असलेल्या जिल्हा खनिज निधीमध्ये जमा झालेल्या निधीमधून नांदेड विधानपरिषद-२०२६ निवडणुकीची आचार संहिता संपुष्टात आल्यानंतर नियामक परिषदेची बैठक आयोजित करण्यात येणार असुन त्यामध्ये खाण बाधित क्षेत्राकरीता कामे हाती घेतली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी कळविले आहे.

---

## जिल्हा वार्षिक आराखड्यांतर्गत दिव्यांग कल्याणासाठी राखीव १% निधीच्या अपुऱ्या वापराबाबत व अंमलबजावणीतील विलंबाबाबत

**(५०) २६६८२ (०६-०५-२०२६). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व जिल्हा वार्षिक आराखड्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी किमान एक टक्का निधी राखीव ठेवण्याचे निर्देश दिले होते तथापि जवळपास एक वर्ष उलटूनही बहुतांश जिल्ह्यांनी हा निधी प्रत्यक्षात खर्च केलेला नसल्याने जिल्हानिहाय मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम, शून्य किंवा अत्यल्प खर्च असलेले जिल्हे कोणते आहेत,

(२) असल्यास, या निधीच्या वापरासाठी स्पष्ट योजना व एकसमान मार्गदर्शक तत्त्वे वेळेत जाहीर न झाल्यामुळे अनेक जिल्हा नियोजन समित्या संभ्रमावस्थेत असून निधी वापरात मोठा विलंब होत असल्याने एकसमान मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्याची प्रस्तावित कालमर्यादा काय आहे तसेच त्या तत्त्वांची प्रमुख रूपरेषा काय असणार आहे,

(३) असल्यास, शिक्षण, रोजगार, आरोग्य, गतिशीलता व पुनर्वसन या क्षेत्रांतील दिव्यांग कल्याण उपक्रम निधी अभावी किंवा निधी न वापरल्यामुळे प्रत्यक्षात प्रलंबित असल्याने जिल्हानिहाय निधी उपयोगासाठी जिल्हा दिव्यांग कल्याण निधी समित्या स्थापन करण्याचा शासनाचा निर्णय किंवा प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर आहे तसेच त्या समित्यांची रचना, अधिकार व कार्यपद्धती काय असणार आहे,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य हे दिव्यांग लोकसंख्येच्या दृष्टीने देशात दुसऱ्या क्रमांकावर असूनही जिल्हा आराखड्यांतर्गत राखीव एक टक्का निधीचा वापर अत्यल्प असल्याने निधीचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सन २०२५-२६ साठी निधी उपयोगाचे लक्ष्य व त्याची टप्पानिहाय अंमलबजावणी योजना काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी (सर्व) यांचेकडून प्राप्त माहितीच्या आधारे असे निदर्शनास येते की, सर्व जिल्हांकडून त्यांचे जिल्हा वार्षिक आराखड्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखीव ठेवण्यात आलेला किमान १% निधी खर्च करण्यात आलेला नाही.

(२) दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या १% निधीच्या वापरासाठी प्रस्तावित योजना व एकसमान

मार्गदर्शक सूचना मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या १% निधीच्या वापरासाठी प्रस्तावित योजना व एकसमान मार्गदर्शक सूचना मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णयान्वये १% निधीच्या वापरासाठी प्रस्तावित योजना व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे.

मा. मंत्रिमंडाळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेबाबत शासन निर्णय/ मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.